# साधना विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त स्पर्धा

**। हडपसर : प्रतिनिधी**

पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत हडपसर येथील साधना विद्यालयामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन केले होते.

आभ्यासाव्यतिरिक्त इतर विषयांचे वाचन मुलांनी करावे या हेतूने 'गणेश उत्सव साजरा करावा की नाही' या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. गणेशोत्सवापरीक्षक म्हणून कल्याणी भाबड व साधना विद्यालयच्या शालिनी शिर्के यांनी काम पहिले. यावेळी गणेश उत्सवामुळे कटुंबात एकता निर्माण होते. तसेच गणेश मूर्तीचा सांस्कृतिक अर्थ समजावून सांगितला. उपमुख्यध्यापक संजय कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन पंखचे सचिन भापकर आणि कौस्तुभ जोगळेकर यांनी केले.